Impact Factor : 3.541 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – VIII Issue – VI November - December 2019

20 व्या शतकात भंडारा जिल्हयातील सहकारी चळवळीचे स्वरूप

प्रा. रामकुमार प्रधान
इतिहास विभाग,
एस.एन.डी.टी. कला व एस.सी.बी.वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, मुंबई – 20

प्रस्तावना :

भंडारा जिल्हा नागपूर विभागात पूर्वेस आहे. भौगोलिक स्थान 20.39 व 21.38'' उत्तर रेखांश आणि 79.27'' व 80.27'' रेखांशपूर्वे असे आहे. वैनगंगा आणि चुलबंद या मुख्य नद्या आहेत. भंडारा जिल्हा तलावांचा जिल्हा व भातशेती करीता अतिशय प्रसिध्द आहे. सहकार चळवळीतून मोठया प्रमाणात विकास झाला. नंतर हळू–हळू सहकार चळवळ नष्ट होऊ लागली आणि त्याऐवजी खाजगी करणाला सुरूवात झाली.

सहकार चळवळीचा इतिहास :

19 व्या शतकात लहान शेतकरी आर्थिक विपन्नावस्थेत होते. याच काळात इ.स. 1895 मध्ये मद्रास राज्य सरकारने ग्रामीण भागात भू–विकास बँक सुरू करण्याकरीता स्थापन केलेल्या कमेटीवर निकोलसन यांची नियुक्ती केली. त्यांनी आपला अहवाल सादर करून ग्रामीण सहकारी पतसंस्था निर्माण करण्याची गरज असल्याची सूचना केली व सहकारी पतसंस्थेच्या संदर्भात आपली भुमिका सरकारला पटवून दिली.

इ.स. 1900 मध्ये अशीच समांतर भूमिका डूपरनेक्स यांनी आपल्या ''पीपल्स बँक ऑफ नार्थन इंडिया'' पुस्तकात मांडली होती. इ.स. 1818 मध्ये फेमिनी आयोगाने सहकार उपयुक्त असल्याचे सांगितले.

पहिला सहकारी पतसंस्था कायदा 1904 :

इ.स. 1901 मध्ये लार्ड कर्झन यांनी एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली आयोग स्थापन केला. त्या आयोगाने आपला अहवाल सादर करून सहकारी पत संस्थेसंदर्भात कायदा निर्माण करण्याची शिफारस केली. त्यानुसार इ.स. 1904 मध्ये पहिला सहकारी पतसंस्था कायदा अस्तित्वात आला. या कायद्यामधील तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

1. कोणतीही दहा सदस्य असलेली संस्था नोंदणी अर्ज करण्यात पात्र ठरेल.
2. ग्रामीण किंवा शहरी भागातील प्रतिष्ठीत पतसंस्थेत 4/5 सदस्य कृषक किंवा अकृषक असावेत.
3. ग्रामीण पत संस्थेला अमर्याद अधिकार होते तर शहरी पत संस्थेला पर्याय देण्यात आले होते.
4. कायद्यातील सर्व तरतुदी व संस्थेवर नियंत्रण ठेवण्याकरीता रजिस्ट्रारची नियुक्ती करण्यात आली.
5. सर्व सहकारी संस्थांना ऑडीट करणे बंधनकारक होते.

एकत्रित बचत आणि सहकारच्या सहय्याने शेतकरी आणि कारगीर यांना प्रोत्साहन देणे हे हया कायद्याचे मुख्य उद्देश होते. कायद्याअंतर्गत संस्थाची निर्मिती केली गेली. त्यांना कायदेशीर स्वरूप व फंड निर्माण करण्याचे अधिकार देण्यात आले. पात्रतेनुसार लघुउद्योगाची सुरूवात केली गेली. सहकारी

संस्थाचे ग्रामीण व शहरी असे वर्गीकरण करण्यात आले.

दुसरा सहकारी पतसंस्था कायदा 1912 :

1905 ते 1911 या काळात सहकारी संस्थामध्ये वाढ झाली होती. चळवळ वाढविण्याच्या दृष्टीने 1904 चा कायदा अपूरा वाटत होता. नविन कायद्याची गरज भासत होती. 1) संस्थेचे पत निर्माण करण्याव्यतिरिक्त उद्देश असतील तर कायदेशीर मान्यता देऊ नये.

2) स्थानिक निधी उभारण्यास अडचणी निर्माण होत होत्या.

या अपूऱ्या गोष्टी भरून काढण्याचे काम 1912 मधील दुसऱ्या सहकारी पतसंस्था कायद्याने केले.

1912 च्या कायद्यानुसार उत्पादक आणि वितरक संस्थाना कायदेशीर मान्यतेची परवानगी व विविध रचनेचे अधिकार केंद्रीय संस्थेला दिले गेले होते. उदा. सहकारी संघटना, केंद्रीय बँक, प्रोव्हीन्सीअल बँक इ. जे उद्योगधंदे अनिश्चित होते. त्यांची कायदेशीर पडताळणी करून पुढे वाढ होण्याकरीता सुरक्षीत तरतुद निर्माण करण्यात आली. ग्रामीण व शहरी असे भेद नष्ट करून मर्यादीत आणि अमर्यादीत अधिकार असे वर्गीकरण करण्यात आले होते. ज्या संस्थेत शेतकरी सदस्य जास्त प्रमाणात आहेत. त्यांना अमर्याद जोखीम देण्यात आली. जुन्या कायद्याप्रमाणे लवचिकता व सुबोधता सुध्दा होती.

नविन कायदयाने चळवळीला चालना दिली गेली. उत्पादन विक्री, खरेदी, शेणखत विक्री, गृहसंस्था आणि विमा कंपन्या इ. सारख्या नविन प्रकारच्या संस्था नोंदणीकृत करण्यात आल्यात. या चळवळीतून मोठया प्रमाणात भांडवल उपलब्ध झाले. सरकाने पालकत्व न स्विकारता योग्य मार्गाने विकास होत राहीला.

इ.स. 1914 मध्ये मॅकलॉन आयोग स्थापन करण्यात आले. या आयोगाच्या अहवालात प्रत्यक्ष विकासाच्या दृष्टीने ऑडिटची उत्तम पध्दत प्रोव्हीन्सीयल बँकेची गती उंचावणे, सदस्यांच्या शिक्षणावर भर व चळवळीच्या नियमीत प्रगतीवर भर दिला गेला.

पंचवार्षिक योजनेचा काळ :–

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळात योजना आयोगाने चीन मधील कृषी सहकारी चळवळीचा अभ्यास करण्याकरीता एक अभ्यास मंडळ पाठविले होते. त्या प्रतिनिधी मंडळाने 1957 मध्ये आपला अहवाल सादर करून संयुक्त कृषी सहकारी संस्था स्थापन करण्यावर भर दिला. अहवालानुसार सरकारने ऐच्छिक स्वरूपात गटाने काम करण्यासाठी संयुक्त कृषी सहकार कार्यक्रमाने सुसुत्रीकरण केले आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेपर्यंत सहकारी शेती करण्याच्या उद्देशास पसंत देण्यात आली.

सहकार चळवळीच्या विकासास दिशा मिळण्याकरीता मुलभूत तत्वाचा समावेश करून ग्रामीण पत संस्थेला खालील प्रमाणे विशेष महत्व दिले गेले.

1. सर्व स्थरावर भागीदारीचा दर्जा
2. बाजारीकरणाबरोबरच पत एकत्रीत करणे

3. सहकार सिध्दांताचे आचरण आणि प्रचार

सहकार चळवळीची रचना व विस्तार :

अ.क्र.	संस्थेचे प्रकार	संस्थेची संख्या		सदस्य		भाग भांडवल		राखीव फंड		खेळते भांडवल	
		1967–68	2001–02	1967–68	2001–02	1967–68	2001–02	1967–68	2001–02	1967–68	2001–02
1.	शेतकरी सहकारी पत संस्था	789 +	1155	99918	112345	73419	10566168	992975	1512530	31191681	91218459
2.	बिगर शेती सहकारी पतसंस्था	13 +	17	2298	8140	106993	155443	10888	55354	314955	9007247
3.	जिल्हा मध्यवर्ती सह. बँक	17 + उपशाखा	35 उपशाखा	1048	71402	6528000	12314598	1382000	5898000	28981000	37994000
4.	राईसमिल	22 –	10	3843	1548	1483387	उपलब्ध नाही	646319	उपलब्ध नाही	2216435	उपलब्ध नाही
5.	भास सह. संस्था	46	51	2640	3145	85352	97532	13670	18768	103533	26281

1. शेतकरी सहकारी पत संस्था :

ही संस्था उत्पादनाच्या दृष्टीने शेतकऱ्यास दिर्घकाळ आणि मध्यमकाळाकरीता कर्ज पुरवठा करते. उदा. विहिर खोदणे, जमिनीचा विकास, बंजर जमीन लागवडी खाली आणणे, घर बांधणी, हंगामी शेतीस आवश्यक घटक इ. कर्ज मुख्यतः खाजगी सुरक्षेवर आणि इतर दोन सदस्य हमी देणारे असल्यास दिले जाते. याशिवाय संस्था जंगम मालमत्ता गहाण म्हणून स्विकारले किंवा पिक अप्रत्यक्ष सुरक्षा म्हणून ठेवत असते. सहकारी संस्थ कर्जावरील व्याजदर आपल्या आर्थिक स्थीतीनुसर आकारत असते. सरकार मात्र संस्थाना कमीत कमी सवलतीच्या दरात कर्ज उपलब्ध करून देत असते.

1968 मध्ये शेतकरी सहकारी पत संस्थाची एकूण संख्या 789 होती. त्यापैकी 21 संस्थाचा व्याप मोठा होता. तर 768 संस्थाचे स्वरूप लहान होते. 1968 मध्ये सदस्यांची एकूण संख्या 99,918 होती.

सदस्य संख्या जास्त प्रमाणात असल्यामुळे साहजिकच भाग भांडवलामध्ये वाढ झाली होती. संस्थेने 138. 58 लाख रू. अल्प मुदतीकरीता तर 46.08 लाख रू. मध्यम कालावधीकरीता कर्ज वितरीत करण्यात आले होते.

इ.स. 2001–02 मध्ये शेतकरी सहकारी संस्थांची संख्या 1155 होती. संस्थांमध्ये वाढ झाल्यामुळे कर्जाचा वाटपात सुध्दा वाढ झाली. 189.79 लाख रू. अल्पमुदती करीता तर 89.15 लाख रू. दिर्घ मुदतीकरीता कर्जाचे वितरण करण्यात आले.

खालील आकडेवारीवरून संस्थेचा विकास दिसून येतो.

भंडारा जिल्हयामधील कृषी सह. पत संस्थेचा विकास :–

तपशील	1965–66	1966–67	1967–68	2001–02
संस्थेची संख्या	790	790	789	1155
सदस्य	90214	95763	99918	112345
भाग भांडवल	5506512	6277050	7393419	10566168
राखीव फंड	787537	823176	992975	1512530
खेळते भांडवल	30070750	30150820	31191981	91218459

बहुद्देशीय संस्था :

कृषी पत संस्थेच्या विकासामधील पुढचा टप्पा गाठणे हे हया संस्थेचे लक्ष्य होते. हि मुलतःह पतसंस्था आहे. अल्पमुदतीच्या कर्जासोबत शेतकरी उत्पादनाच्या बाजारीकरणाचे एकत्रीकरण करणे हे उद्देश आहे. शेतीस आवश्यक बियाणे, खत, वैरण पुरवठा करणे उत्पादनाच्या संयुक्त विक्रीची तजवीज करणे हे ध्येय आहेत. गोडाऊन बांधणे, शेतीमालाची साठवणूक करणे तसेच इतर आवश्यकता भासल्यास सरकार अधिकृत रजिस्ट्रार कडून बहुद्देशीय संस्थाना अल्पदारत कर्ज मंजूर केले जाते.

बिगरशेती सहकारी पत संस्था :–

ही मुख्यतः शहरी संस्था आहे. तीचा सदस्य वर्ग व्यापारी, कलाकार आणि कारखान्यात काम करणारे मजदूर आहेत. यात नागरी बँक आणि इतर पत संस्थांचा समावेश आहे. या संस्थाना काम करण्याकरीता शहर, विभाग किंवा खाजगी व सरकारी संस्थेतील विभाग अशी मर्यादा असते. त्या संस्थेच्या कामकाज क्षेत्रात येणाऱ्या सर्वांना त्याचे सदस्यत्व खुले असते.

हि संस्था शेअर्स, चालु बचत ठेव, मुदत ठेव या शिवाय कर्जदाराकडून आणि मध्यवर्ती संस्थेकडून भांडवल उभे केले जाते. संस्था अग्रीम कर्ज देत असताना सभासदाकडून मालमत्ता गहाण किंवा मौल्यवान वस्तू या पैकी एक सुरक्षा ठेव म्हणून ठेवत असते. सहकारी संस्था आणि शहरी सरकारी/ नागरी बँकांचे सध्या आधुनिकीकरण झाले आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक :–

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्यतः कृषी पत संस्थांना त्यांचा व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने मदत करीत असते. याशिवाय औद्योगिक संस्थाना कर्ज पुरवठा करून त्याचे उत्पादन वाढविते. 1967–68 मध्ये जिल्हयात मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकूण 17 उपशाखा होत्या तर 1048 सदस्य संख्या होती.

2001–02 मध्ये मध्यवत्री सहकारी बँकेच्या उपशाखानंमध्ये वाढ झाली. त्याची एकूण संख्या 35 होती व सदस्य संख्या 71,402 होती. बँकेने 45.09 लाख रू. अल्पमुदतीकरीता तर 35.37 लाख रू. दिर्घ मुदतीकरीता कर्जाचे वाटप केले होते.

सहकारी राईस मिल :–

भंडारा जिल्हा भातशेतीकरीता अतिशय प्रसिध्द आहे. भाताचे तांदळात रूपांतर करण्याकरीता मोठया प्रमाणात राईस मिलची सहकारी तत्त्वावर निर्मिती करण्यात आली. 1968 मध्ये जिल्हयात एकूण 22 राईस मिल होते. त्यांनी 7,70,600 रू. महाराष्ट्र शासनाकडून भांडवल घेतले होते. तसेच इतर सहकारी संस्थाकडून सुध्दा कर्ज घेतले होते. भाताचे तांदळात रूपांतर करण्याकरीता शेतकरी सदस्य, सहकारी संस्था यांचेकडून भात खरेदी केले जाते.

इ.स. 2001–02 मध्ये संपूर्ण जिल्हयात 10 सहकारी राईस मिलचे काम सुरू होते व 12 राईस मिल बंद पडले होते. त्याची सदस्य संख्या केवळ 1548 होती.

निष्कर्ष :–

भंडारा जिल्हयातील सहकारी चळवळीमुळे सहकारी संस्थांच्या अभ्यासावरून राईस मिल वगळता इतर सहकारी संस्थांमध्ये विशेषतः शेतकरी सहकारी पत संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मत्स्य सहकारी संस्था याच्यात भरीव वाढ दिसून येते.

संदर्भ सूची :–

1. महाराष्ट्र स्टेट ग्रॅझेटिअर – भंडारा जिल्हा – 1979
2. कमिटी रिपोर्ट – 1954
3. रिपोर्ट ऑफ द इंडियन डेलिगेसन टू चायना ऑन अग्ररिअन को. ऑपरेशन – 1957
4. गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, रिपोर्ट ऑफ द कमिटी ऑन को. ऑपरेटिव्ह क्रेडीट – 1960
5. दुसरी पंचवार्षिक योजना
6. तिसरी पंचवार्षीक योजना
7. भंडारा जिल्हा मध्यवर्ती सह.बँक वार्षिक अहवाल – 2002
8. को. ऑपरेटिव्ह मुव्हमेंट ऑफ इंडिया जी.आर. भवन